ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# तत्वज्ञान–अध्ययन–अध्यापन–संशोधन

*डॉ. सुधीर पिटके,

*उपाध्यक्ष,महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद माजी तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मुधोजी महाविद्यालय फलटन

तत्त्वज्ञान अध्ययन, अध्यापन व संशोधन ह्य विषयावर माझ्या ३८ वर्षे अध्यापनाच्या अनुभवाच्याया आधारे काही विचार मांडत आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचा साहित्य शाखेकडे प्रवेश घेण्याचा कल कमी होऊ लागला आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान, संस्कृत अशा विषयाचे महाविद्यालयातील अध्यापन बंद तर होणार नाही ना अशी काळजी वाटत आहे, तरीदेखील मी खूप आशावादी आहे. त्यातूनच काही उपाय या लेखाद्वारे मी सुचवित आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा 'तत्त्वज्ञान' विषयात कोणत्या गोष्टीचा समावेश होतो? तत्त्वज्ञान म्हणजे काय ? याबाबत गैरसमज झालेला आढळतो. त्यांना वाटते तत्त्वज्ञान म्हणजे केवळ धार्मिक गोष्टी–ईश्वर, आत्मा, मोक्ष जाणून घेणे एवढेच असते. अशा वेळेस तत्त्वज्ञान हे आपल्या जीवनाशी कसे निगडीत आहे आपल्या जीवनातील अनेक समस्याची कशी उत्तरे देते, ही उत्तरे काय आहेत हे प्रारंभी विद्यार्थ्यांना सांगावे म्हणजे तत्त्वज्ञान विषयाबाबत त्यांचा गैरसमज दूर होईल.

विद्यार्थ्यांना ज्ञान म्हणजे काय, ते ज्ञान आपणास कसे प्राप्त होते, योग्य विचार म्हणजे काय, तो कसा करावा अनेक तत्त्वचिंतकाचे विचार सांगून ते विचार माणसाला जगण्यास कसे उपयुक्त ठरते ते सांगावे. नंतर अभ्यासाक्रमाकडे वळावे.

'तत्त्वज्ञान' विषयाचे अध्यापन रोचक कसे होईल? विद्यार्थ्यांना त्याबद्दल आवड कशी निर्माण होईल ? याबाबत सांगता येईल की पाठ्यपुस्तकातील भाषा ही तांत्रिक स्वरूपाची असते त्यामुळे ती विद्यार्थ्यांना कंटाळवाणी वाटते तेव्हा अध्यापन करताना व्यावहारिक रोज भाषेचा वापर करणे उपयुक्त ठरेल.

'तत्त्वज्ञान' विषयाचे अध्यापन करताना प्राध्यापकाने श्रीनिवास दीक्षित, सु. वा बखाले यांच्या पुस्तकांचा अवश्यवापर करावा कारण या दोन्ही लेखकांनी लेखन करताना सोपी, सुलभ भाषा वापरलेली आहे. मात्र प्राध्यापकांनी स्वत: अध्ययन करताना 'मराठी तत्त्वज्ञान महाकोश',ग. ना. जोशींचे 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास' तीन खंड त्याबरोबरच त्यांनी संपादित केलेले भारतीय तत्त्वज्ञानाचे खंड अवश्य आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना प्रा. शि. स. अंतरकर यांचा भाषा, तर्क आणि सत्य' (Language Truth & Logik A.J.Ayer) याचा अनुवादित ग्रंथ, रविंद्र मनोहर यांचा 'अस्तित्त्ववाद' हा ग्रंथ अवश्य वाचावा.

तसेच नीतिशास्त्राच्या अभ्यासासाठी प्रा. मु. पु. रेगे यांचा 'पाश्चात्य नीतिशास्त्राचा इतिहास' अवश्य अभ्यासावा. त्याबरोबरच 'परामर्श', 'विचारशलाका' यांचे जुने, नवे खंड अवश्य अभ्यासावेत.

थोडक्यात प्राध्यापकांनी देखील विद्यार्थ्यांप्रमाणे अध्ययन करणे गरजेचे आहे.तसेच वैज्ञानिक पद्धती, तर्कशास्त्र, मानसशास्त्र या विषयांचा अभ्यास करणारे विद्यार्थी 'तत्त्वज्ञान' विषयाकडे कसे आकर्षित होतील हे पाहीले पाहिजे.पदवीपर्यंतचे अध्ययन आणि पदव्युत्तर अध्ययन यात निश्चितच फरक आहे. पदवीपर्यंतच्या अध्ययनात त्या विषयातील प्राथमिक माहिती,संकल्पना ह्यांचा समावेश होतो. त्यांचे आकलन होण्यासाठी अध्यापकांची मदत घ्यावी लागते. जितके अध्यापक विद्यार्थ्यांसाठी कष्ट घेतील तेवढे विद्यार्थी विषयात रूचि दाखवतील.

विद्यार्थ्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास कशासाठी करावयाचा, त्याचा आपल्याला नेमका काय उपयोग आहे हे त्याला समजले पाहिजे. अध्यापकांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास कशासाठी करावयाचा हे विद्यार्थ्यांना सांगणे गरजेचे आहे. त्यांना सांगितले पाहिजे की विचारांना योग्य दिशा मिळण्यासाठी,आपल्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी तत्त्वज्ञानाचा अभ्यास उपयुक्त ठरतो. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने आपल्या अनुभवाला तर्कनिष्ठ आाधार मिळतो, आपले विचार, व्यक्तीमत्त्व फुलत जाते, विकसित होत जाते.

पदव्युत्तर अध्ययनात विद्यार्थ्यांना स्वत:ला अभ्यास करावा लागतो, मूळ ग्रंथाचे वाचन करावे लागते. पदव्युत्तर अध्यापन करणारे प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी दूर करतात, त्यांच्या शंकाचे निरसन करतात. त्यांच्या विचारांना योग्य दिशा देत असतात.

मात्र विद्यार्थ्यांच्या अध्ययनात दोन्ही प्राध्यापकांचे स्थान सारखेच महत्त्वाचे असते. पदवीपर्यंत अध्यापन करणारे प्राध्यापक विद्यार्थ्यांना विषयाबाबत रूचि निर्माण करतात तर पदव्युत्तर अध्यापन करणारे प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या विचारात ठामपणा आणतात. विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेताना किंवा शिक्षण पूर्ण झाल्यावर आपल्या पदवीपर्यंतच्या अध्यापकांना बरेच वेळा विसरतात हे योग्य नव्हे. कारण याच अध्यापकांनी विद्यार्थ्यांला बोट धरून त्या विषयाकडे नेलेले असते. मला आठवते आमच्या एका विद्यार्थ्याने त्यांच्या पीएच. डी.च्या आपल्या प्राथमिक शिक्षकांना बोलावले होते व त्यांचा सत्कार केला होता. मला त्याचे खूप अप्रुप वाटले.

**विद्यार्थी संख्या:**

'तत्त्वज्ञान' विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या मुंबई, विदर्भ, मराठवाडा विभागात समाधानकारक आहे परंतु पुणे आणि शिवाजी विद्यापीठात ही संख्या खूपच कमी आहे. तसेच पुणे आणि शिवाजी विद्यापीठात तत्त्वज्ञान' विषय शिकविला जातो अशा महाविद्यालयाची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याएवढी देखील नाही. ही गोष्ट निश्चित चिंता करण्यासारखी आहे.

दोन्ही विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यरत असलेले प्राध्यापक सेवानिवृत्त झाल्यावर विद्यार्थी संख्येअभावी नवीन नेमणूकादेखील होऊ शकणार नाहीत त्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना

ISSN–2277- 8721
Electronic International Interdisciplinary Research Journal
EIIRJ
Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

महाविद्यालयात अध्यापनाची संधी मिळू शकणार नाही.

सध्या कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना माझे असे सांगणे आहे की, विविध परिषदामध्ये उपस्थित राहणे, शोधनिबंध सादर करण्याइतकेच आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञान विषयाकडे वळविणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपल्या अध्यापनाने विद्यार्थीप्रिय बनणे, त्यांना नियमितपणे अध्यापन करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आवश्यक अध्यापन कौशल्य मिळविणे,कष्ट घेणे गरजेचे आहे. जे प्राध्यापक नियमितपणे असे वागतात ते कौतुकास्पद आहेत परंतु प्रत्यक्ष अध्यापनाकडे दुर्लक्ष करणारे प्राध्यापक केवळ विद्यार्थ्यांना तयार नोटस् देणारे प्राध्यापक नाहीत असे नाही स्पष्ट लिहिल्याबद्दल क्षमस्व! कारण आपल्या कृतीनेच आपण विद्यार्थ्यीसंख्या वाढवित असतो किंवा कमी करीत असतो. आपला विषय लोकप्रिय करीत असतो.

**तत्त्वज्ञान विषयातील संशोधन:**

'तत्त्वज्ञान' विषयातील संशोधनाला एखाद्या शोधनिबंधाने प्रारंभ होत असतो तर पीएच. डी. साठी 'प्रबंधलेखन' ही दीर्घकाल चालणारी प्रक्रिया आहे. तिच्या स्वरूपाविषयी थोडे विवेचन करता येईल.

नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिकशास्त्रे यातील संशोधन भिन्न असते. नैसर्गिक शास्त्रातील संशोधन हे निश्चित स्वरूपाचे आणि उपयोजित स्वरूपाचे असते. त्यातील प्रयोग कोणाही संशोधकाने केला तरी निष्कर्ष सारखाच येत असतो. परंतु सामाजिक शास्त्रातील संशोधनाबाबत तसे घडत नाही. सामाजिक शास्त्रातील संशोधनात संशोधकाची आर्थिक, सामाजिक स्थिती, धार्मिक प्रभाव यांचा निश्चित प्रभाव पडत असतो. तसेच या संशोधनात नैसर्गिक शास्त्रातील संशोधनाएवढी अचूकता नसते.

नाविन्य (Novelty) हा संशोधनातील महत्त्वपूर्ण घटक असतो. तत्त्वज्ञानातील संशोधनात उपलब्ध ज्ञानाची/ माहितीची फेरमांडणी केलेली असते. वेगळी अशी पुनर्रचना केलेली असते. वेगळ्या पद्धतीने विश्लेषण विवेचन केलेले असते.

संशोधकाने संशोधनासाठी नेहमीपेक्षा वेगळा असा विषय निवडावा. अभ्यासविषयाकडे इतरांचे दुर्लक्ष झालेले आहे पण जो विषय महत्त्वपूर्ण आहे अशा विषयाची निवड केली पाहिजे. त्याबरोबरच हा विषय समाजाला कितपत उपयुक्त आहे हे पाहिले पाहिजे. थोडक्यात संशोधकाने समाजाभिमु संशोधन केवळ पीएच. डी. पदवी मिळविण्यासाठी किंवा तीनं पगारवाढी मिळविण्यासाठी नाही हे अध्यापकाने लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

संशोधनामध्ये मार्गदर्शकाची (Guide) भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. त्याच्या मदतीने आपल्या आवडीचा विषय निवडणे, त्याची पूर्वतयारी करणे हा पहिला टप्पा ठरतो. त्यासाठी उपलब्ध मूळ ग्रंथाचे वाचन करावे. संशोधनाच्या पूर्वतयारीला कितीवेळ लागेल हे निश्चित सांगता येत नाही.त्यानंतर संशोधन विषयाबाबत आतापर्यंत झालेले संशोधन व्यवस्था उपलब्ध ग्रंथाचे वाचन त्यावर टिपणे काढणे, ग्रंथ—लेख यांची सूची बनविणे, त्या विषयातल्या तज्ज्ञांना भेटणे, त्यांची मते जाणून घेणे अशा सर्व

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

गोष्टींचा पूर्वतयारीत समावेश होतो.

प्रबंधलेखन सुरू करण्यापूर्वी संशोधकाने आपल्याला नेमके काय मांडायचे आहे. त्याबद्दल विचार करावा. आपल्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी आपल्या मार्गदर्शकाला मोकळेपणाने शंका विचाराव्यात, ते आपल्याला शंका विचारण्याबद्दल काय म्हणतील याचा विचार करू नये. एकदा संकल्पना स्पष्ट झाल्या की विचाराची मांडणी करणे सोपे जाते. प्रबंध लेखनाची भाषा मोघम स्वरूपाची नसावी त्यात निश्चितपणा असावा, स्पष्टता असावी हे केव्हा जमते तर जेव्हा आपला विचार, संकल्पना स्पष्ट असतात. थोडक्यात प्रबंध लेखन करण्यापूर्वी संशोधकाने आपल्या मनातील वैचारिक गोंधळ दूर करावा. प्रबंध लेखन चालू असताना आपण लिहिलेले लिखाण आपल्या सहाध्यायांना विषयातील अभ्यासकांना दाखवावे,त्यांच्याशी त्याबाबत चर्चा करावी, त्यांनी केलेल्या सूचनांचा स्वीकार करावा त्याबाबत कमीपणा मानू नये. प्रबंध लवकरात लवकर पूर्ण होण्यापेक्षा तो सर्वसमावेशक, आखीव, रेखीव कसा होईल ते पहावे. प्रबंध लेखन जर आपण मराठी भाषेत लिहित असू तरी देखील त्या विषयावरील इंग्रजी ग्रंथाचे वाचन करावे, त्यातील संकल्पनाचे आकलन होत नसेल तर आपल्या शंका मार्गदर्शकांना निशःकपणे विचाराव्यात, त्यात कमीपणा मानू नये.

प्रबंध लेखनातील सर्व प्रकरणे लिहून झाल्यावर शेवटचे निष्कर्षाचे प्रकरण लिहावयाचे आहे ते लिहित असताना आपणास मार्गदर्शकाची मदत होत असते. प्रबंधाच्या तांत्रिक बाबीबाबत मी अधिक लिहित नाही. पण प्रबंध लेखकनाचे टंकलेखन करताना शुद्र लेखनाच्या चूका दुरूस्त कराव्यात त्यासाठी एखाद्या प्रुफरीडरची मदत घ्यावी. थोडक्यात प्रबंध लेखन लिहिण्याची व तो सादर करण्याची घाई करू नये. ती जास्तीत जास्त निर्दोष कसा होईल ते पहावे.

प्रबंध विद्यापीठाकडून मान्य झाल्यावर त्याचे ग्रंथरूपाने प्रकाशन करण्यातही घाई करू नये. दोनतीन वर्षांनी तो प्रकाशित करावा. प्रबंधातील भाषा जशीच्या तशी वापरण्यापेक्षा तत्त्वज्ञानप्रेमी वाचकांना तो समजेल अशा भाषेत पुनर्लेखन करावे. त्यायोगे तो ग्रंथ जास्तीत जास्त वाचकांकडून वाचला जाईल. प्रबंध प्रकाशनाचा आपला हेतू त्यामुळे सफल होईल.

**Cite This Article:**

* *डॉ.सुधीर पिटके,(2022*) तत्त्वज्ञान–अध्ययन–अध्यापन–संशोधन, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 23-26.*